# 'शेतकऱ्यांचा असूड' : शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या व उपाय

**डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे**
**शहाजी कॉलेज, कोल्हापूर.**

महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील एक समाजसुधारक आणि प्रामुख्याने समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची चिकित्सा करणारे थोर क्रांतिकारक, विचारवंत म्हणजे महात्मा जोतिराव फुले होय. त्यांनी तत्कालिन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. आणि त्यांना या समाजव्यवस्थेत स्त्रिया, श्रमिक, शेतकरी, पददलित यांच्यावर राजसत्ता आणि धर्मसत्ता यांच्याकडून शोषण होत आहे असे दिसुन आले. गरीब, अज्ञान, कष्टाळू, शूद्र शेतकरी आणि अस्पृश्यादि अतिशूद्रांचे शोषण वाढले आहे. पण याला वाचा फोडायची असेल तर शुद्रातिशूद्रांना साक्षर करणे हाच एक सर्वोत्तम उपाय आहे. हे जाणून म.फुल्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' (इ.स. १८८३) ही एक आत्यंतिक महत्त्वाची ग्रंथ निर्मिती केली. या ग्रंथाचा मुख्य उद्देश म्हणजे ''सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे त्यांचे होणारे शोषण चव्हाट्यावर आणावे व शेतकऱ्यांनीही आपला धर्मभोळेपणा सोडून विद्या संपादन करावी, व्यसनांधता सोडून द्यावी, न्याय हक्काची जाणीव ठेवावी या प्रधान हेतुने या ग्रंथाचे लेखन फुल्यांनी केले आहे''.[१] हा ग्रंथ म्हणजे वाचकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा ठरतो. ग्रंथाच्या सुरूवातीलाच शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म.फुले म्हणतात, ''विद्येविना मति गेली, मतिविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''[२] शिक्षणाअभावी शेतकऱ्यांची आणि शूद्रादिशूद्रांची सारासार विचारकरणारी विवेक शक्ती नष्ट होते. याचे प्रत्ययकारी दर्शन घडते. 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ प्रामुख्याने शेती आणि शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांच्या स्थितीची समस्या व त्यावरील उपाय सांगण्यासाठी लिहिला गेला आहे.

'शेतकऱ्यांचा असूड' (इ.स. १८८३) हा ग्रंथ एकूण पाच प्रकरणात विभागला आहे. यामध्ये इंग्रजी सत्तेतील इंग्रजी अधिकारी ऐषआरामात आणि सुखविलासात गुंतले असल्यामुळे त्यांचे शूद्र शेतकऱ्यांकडे लक्ष नाही. एकुणच, ब्राह्मण मंडळी शेतकऱ्यांना लुबाडण्याचे काम करते, शेतकरी नाडला जात आहे, यातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी, बचाव व्हावा हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे. या ग्रंथाच्या **पहिल्या प्रकरणात** शासकीय सेवेत ब्राह्मण अधिकाऱ्यांचेच वर्चस्व असल्याने भिक्षुकी पेशा पत्करून जगणारे ब्राह्मण शेतकऱ्यांची धार्मिक कारणावरून विविध मार्गाने लुट करीत होते. बारसे, विवाह, श्राद्ध, पक्ष, गृह, शांती, वास्तूशांती इ. अशा कारणांमुळे गरीब व अज्ञानी शेतकऱ्याला लुबाडत होते. यावर उपाय म्हणून अज्ञानी शोषीत समाजास जागे करून त्या दृष्टीने शिक्षक, मार्गदर्शक भूमिकेतून ते सर्व बाबी लक्षात आणून देण्याचा फुल्यांचा प्रयत्न दिसतो. शुद्रातिशुद्रांची लुबाडणूक, छळ, इंग्रज सरकारने थांबवावे, त्यांच्या हिताच्या योजना राबविणे, उद्धार करून पुरोहितशाहीच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका करणे हे महत्त्वाचे आहे.

**दुसऱ्या प्रकरणात** शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेत इंग्रज अधिकारी आणि शासनातील ब्राह्मण अधिकारी कसे कारणीभूत आहेत याचे चित्रण केले आहे. तत्कालीन लोकसंख्या वाढीचा, बेकारीचा, शेतीच्या कमी होत चाललेल्या कसदारपणाचा, ग्रामीण उद्योगधंद्यांचा व परदेशी आयात मालाने आणलेल्या विपत्तीचा, शेतकऱ्याच्या आपसातील तंटेबखेडे, त्यांना झुंजायला लावणाऱ्या, गावकामगार, वकील, न्यायाधिश, इ. सावकारशाहीमुळे ग्रासलेल्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार मांडला आहे. त्या काळी तीस वर्षातून एकदा सरकार शेतीची पाहणी आपल्या अधिकाऱ्यामार्फत होत असे. परंतु इंग्रज अधिकारी चैनीत गुंतले असल्यामुळे हे काम ब्राह्मण अधिकारी करत असत. त्यामुळे शेतीची अवस्था त्याबद्दलची वास्तव स्थिती सरकारच्या लक्षात येत नसे. म्हणूनच वास्तवस्थिती समोर यावी. शेतकऱ्यांची दु:खे चव्हाट्यावर मोजवीत या जाणिवेतून म.फुले यांनी लेखन केले 'शेतकऱ्यांचा असूड' च्या **तिसऱ्या प्रकरणात** शुद्रातिशुद्रांच्या शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची कारणमीमांसा शोधली आहे. इंग्रजी अधिकारी आणि ब्राह्मण यांनी भरपूर पगाराच्या नोकऱ्या व निवृत्ती वेतनाच्या निमित्ताने पैशाची उधळपट्टी चालवली. पैसा वसूल केला जात होता. शेतकऱ्यांकडून पैसा लुबाडून शहरात सुधारणा करण्यात येत होत्या. मात्र शेतकरी वर्ग अधिक दरिद्री होत गेला. मुलाबाळांसह कष्ट करूनही पोटभर अन्न मिळत नव्हते. अगंभर वस्त्र मिळत नव्हते. खोट्या प्रतिष्ठेसाठी लग्न, बारसे, इ. भरमसाठ पैसे खर्च करून शेतकरी कर्जबाजारी होत होते. अशा गोष्टीमुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय होत जात होती. त्यावेळी म.फुले यांनी सरकारला सूचना केली की, सरकारने सरकारी खात्यातील लोकांचे पगार कमी करावेत व अज्ञानाने ज्यांची परिस्थिती

गांजली आहे अशा लोकांस शिक्षण द्यावे, शेतकरी वर्गाकडून शेतसारा, लोकल फंड, जकात वगैरे कर कमी करावेत. कारण याचे होणारे दुष्परिणाम भयानक स्वरूपाचे असतील याची दूरदृष्टी फुल्यांना होती.

तर **चौथ्या प्रकरणात** शेतकरी आणि त्याच्या शेतीची तत्कालीन परिस्थितीचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. यामध्ये शिंदे, गायकवाड दि राजघराण्याशी दुरून का होईना संबंध असल्याचा अभिमान बाळगणाऱ्या कंगाल, कर्जबाजारी, अज्ञानी व हप्त भरण्यास कलेक्टरने मुदतवाढ न दिलेल्या शेतकऱ्यांचे अत्यंत बारीक-सारीक तपशीलासह वर्णन केले आहे. शेतीची अवस्था वाईट होती. मांसाहार करण्याची संख्या वाढल्याने गाई-बैलांची हत्या होत होती. त्यामुळे शेतीच्या मशागतीसाठी बैलांची कमतरता भासत होती. याशिवाय दुष्काळामुळेही गुरांची चाऱ्याअभावी उपासमार होऊन व लाळीचे रोग पसरवून साथीचे रोग होऊन जनावरे मरत असत. उरलेल्या गाई-बैलांना चारायला जागा नव्हती. खत पाण्याअभावीही पूर्वीसारखे पीक येत नव्हते. तसेच शेतकरी औषधोपचारावर विश्वास न ठेवता लुबाडले जाऊन आजारी पडत असत. बालविवाह बहुपत्नीत्व यामुळेही शेतकऱ्यांमधील पुरूषार्थ कमी झाला. आपसातील तंटेबखेडे, खोटी प्रतिष्ठा, व्यसनाधिनता यामुळे शेतकरी पोखरला जात होता. पण यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांच्या मुलांना शिकवून त्यांच्यातीलच मुलांना शिक्षक म्हणून शाळांवर नेमावे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वृत्तीत फरक पडेल. शिक्षण हाच एकमेव सर्वोत्तम उपाय यावर फुल्यांचा भार होता.

**पाचव्या प्रकरणात** शेतकऱ्यांच्या संबंधी सूचना आणि शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी म्हणून कोणकोणते उपाय केले पाहिजेत हे सविस्तर मांडले आहे. इंग्रज सरकारने पैशाचे लोभ सोडावा व शेतकऱ्यांच्या आचरणाकडे लक्ष ठेवावे, त्यांची प्रकृती, नीतीमत्ता वाढेल असे बघावे, बालविवाह, बहुपत्नीत्व यावर बंदी घालावी, शेतकऱ्यांच्या मुलांना त्यांच्याच जातीतील प्रत्यक्ष शेतीची कामे करून दाखविणारे शिक्षक नेमावेत, जसजशी मुले शिकत जातील तसतसे त्यांना सरकारी कचेऱ्यातून असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदावर नेमावे. दारू पिणाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी. भेसळ माल जप्त कराव हे उपाय केल्यानंतर शेतकऱ्यांची उन्नती होऊ शकेल. तसेच शेती सुधारणेसाठी शासनाने कोणकोणते उपाय योजावेत हे सुद्धा फुले सांगतात.''

''जोपर्यंत यंत्राद्वारे शेती करण्याचे ज्ञान येथील शेतकऱ्यांना मिळत नाही तोपर्यंत मांसाहार करणाऱ्या लोकांनी गाई बैलांची हत्या न करता शेळ्या बकऱ्या खाव्यात किंवा परमुलुखातून ते आणून खावेत असा कायदा करावा. जमीनीची धूप होऊ नये म्हणून व पावसामुळे ती वाहून जाऊ नये म्हणून लष्करातील शिपाई व पोलीस यांच्या मदतीने शेतांना तालीवजा बंधारे घालावेत. नवीन विहीरी खोदण्यास प्रोत्साहन द्यावे. जंगलातील झाडे तोडण्यास मनाई करावी. परदेशातून शेळया मेंढ्याची बेणी आणून ती वाढवावीत व त्यांच्या लेंडीमुताने शेतीस खत पुरवठा करावा. जर शेतकऱ्यांना शस्त्रे देता येत नसतील तर शेतीमधील पीकांचे रक्षण करण्याचे काम पोलीस खात्याकडे द्यावे. या उप्परही जर पीक खाल्ले अथवा खुडून नेले तर त्याची नुकसान भरपाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या पगारातून करून द्यावी असा कायदा करावा. दरसाल शेतीविषयक प्रदर्शने भरवावीत. शेतपिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन उत्तम शेतकऱ्यांना पदव्या द्याव्यात. शेतीला उपयोगी असणारी अवजारे तयार करण्याचे शिक्षणही शेतकऱ्यांच्या मुलांना द्यावे. यासाठी त्यांना शिक्षणासाठी परदेशात पाठवावे. शेतीचे पीक चांगले झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खिशात पैसा झाल्यानंतर शेतकरी जोगतिणी, आरधिणी, मुरळ्या, कोल्हाटणी व कसबिणीच्या नादी लागून तो खर्च करतात. यासाठी त्यांच्यावर व तमासगीर, नाटककार, कथाडे यांच्यावर कुनितीपर गाणी गाऊ नयेत म्हणून बंधने लादावीत. शेतकरी आपल्या बायकामुलांसह रात्रंदिवस शेतात राबून पीक काढतो. मात्र त्यातून मिळणारा पैसा सरकार कर, पट्ट्या , फंड वगैरे जकातीद्वारे वसूल करते. मात्र त्या मोबदल्यात शेतकऱ्याच्या मुलास शेतकी संबंधीचा ग्रंथ वाचण्याएवढे किंवा वर्तमानपत्रातील शेतकीसंबंधाची माहिती वाचण्याएवढे ज्ञानसुद्धा सरकार देत नाही, मोठमोठ्या पगारावरील काळ्या गोऱ्यांच्या नेमणुका कमी कराव्यात त्यांचे पगार, पेन्शन कमी करावेत''[३] इत्यादी सूचना महात्मा फुल्यांनी या प्रकरणात केल्या आहेत.

एकूणच या ग्रंथावर दृष्टिक्षेप टाकता, फुले यांचे विचारात शेती घडवून आणण्याचे सामर्थ्य होते असे दिसून येते. महात्मा फुल्यांनी शेतकरी कष्टकरी वर्ग हा प्रतिष्ठित असला पाहिजे आणि शेती ही उत्तम केली पाहिजे या दृष्टिने प्रथमतःच विचार मांडले. आपले आजुबाजुला अफाट पसरलेल्या जनसमुदायाकडे सहानुभूतीने पाहण्याची दृष्टी महत्मा फुल्यांनी प्रथमतःच दिली हे कुणालाही मान्य करावे लागेल. ग्रामीण जनता तिचे प्रश्न, त्यांची दुःखे यांना प्रथमतःच वाचा फुटली. ती महत्मा फुल्यांच्या रूपानेच''.[४] आजही हा ग्रंथ शासनाला मार्गदर्शक ठरला आहे. म.फुले यांनी सुचवलेल्या योजना शंभर वर्षांनी सरकारला हाती घ्यावा लागत आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे यांवर नव्याने संघटना कार्यरत आहेत. शेतमालाची प्रत ठरविण्याचे धोरण सहकारी चळवळींनी स्विकारले आहे. कृषि विद्यालये, कृषि

महाविद्यालये, कृषि विद्यापीठ आज कार्यरत असताना दिसत आहेत. शेती मालाची प्रदर्शने भरवले जात आहेत. सामाजिक सुधारणा करणाऱ्यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रंथाचे लेखन केले. विचार क्रांतिकारक, विद्रोही, आणि प्रस्थापित व्यवस्थेला नकार देऊन न्याय मिळवता यावा इतके परिवर्तनाचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात असलेले दिसून येते.

एकूणच, 'शेतकऱ्यांचा असुड' हा वास्तव स्थितीचे प्रत्ययकारी चित्रण करणारा मौलिक ग्रंथ आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सुचविलेल्या योजना, प्रस्थापित वर्गव्यवस्थेविरूद्ध बंडखोरी, विद्रोह यांविषयीचा परिपूर्ण विचार समजून घेऊन त्या दिशेने वाटचाल करणे हेच या ग्रंथाचे यश ठरेल.

१) मुलाटे, वासुदेव (संपा.) : 'शेतकऱ्याचा असुड', स्वरूप प्रकाशन, आवृत्ती चौथी, २०००, पृ. २.
२) तत्रैव, पृ. ३.
३) तत्रैव, पृ. १४.
४) कोत्तापल्ले, डॉ. नागनाथ : 'शेतकऱ्यांचा असुड', महात्मा फुले गौरव ग्रंथ.